**संच : क**

# शिक्षकांसाठी सूचना सहावी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - सहावी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ४०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) टरबूज | २) गैरहजर |
| ३) अथर्व | ४) वऱ्हाड |
| ५) उत्तर | ६) चित्रपट |
| ७) गंमत | ८) कॅमेरा |
| ९) प्रवेश | १०) राष्ट्रसेवा |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना काही बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'गंमत' ऐवजी 'गमंत' किंवा 'अथर्व' ऐवजी 'अथरव' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न २)** मुंगीला (गुण १)

**प्रश्न ३)** एखाद्या मुंगीला अन्नाचा साठा सापडला की, ती आपल्या वसाहतीकडे परत येताना त्या मार्गात आपल्या शरीरातून विशिष्ट प्रकारचे गंधकण सोडत येते. (गुण २)
(पूर्ण उत्तर लिहिल्यास दोन गुण द्यावेत, एक वाक्य लिहिल्यास एक गुण द्यावा.)

**प्रश्न ४)** **ब)**मिशी (गुण २)



***Runa Graphics :** Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**प्रश्न ५ ते ७) ही कविता वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ५)** **क)** चिकण माती (गुण १)

**प्रश्न ६)** **ब)** जातं (गुण २)

**प्रश्न ७)** भावासाठी (गुण २)

**प्रश्न ८ ते १०) ही बातमी वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ८)** **ब)** ओला कचरा (गुण १)

**प्रश्न ९)** **ब)** नागरिकांमध्ये जनजागृती करणे व नागरिकांनी जबाबदारी घेणे. (गुण २)

**प्रश्न १०)** जास्तीत जास्त ओला कचरा खताच्या माध्यमातून जिरवला जाणार आहे. नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगळा वेगळा ठेवणे. या सारखे योग्य उत्तर स्वीकारावेत. (गुण २)

**प्रश्न ११ ते १५) खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.** (गुण १०)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न ११)** नाम – जॉन (गुण १)

वाक्य – जॉन अभ्यासात हुशार आहे. (गुण १)

याप्रमाणे कोणत्याही योग्य वाक्यास १ गुण द्यावा.

**प्रश्न १२)** मयुरी ऐवजी 'ती' सर्वनाम वापरले तर दोन गुण द्यावेत.

**ती** रोज व्यायाम करते. (गुण १)

**तिने** शाळेच्या सर्व स्पर्धांमध्ये भाग घेतला.

(प्रत्येक बरोबर सर्वनामास एक गुण याप्रमाणे एकूण २ गुण)

**प्रश्न १३)** विशेषण – रसदार (गुण १)

रसदार हा शब्द येणारे अर्थपूर्ण वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. (गुण १)

**प्रश्न १४)** वर्तमानकाळ – मी आनंदाने उड्या मारत आहे/ मी आनंदाने उड्या मारतो. (गुण १)

भविष्यकाळ – मी आनंदाने उड्या मारीन. (गुण १)

**प्रश्न १५)** **अ)** अनुजाला परदेशात जाण्याची संधी मिळताच ती हुरळून गेली. (गुण १)

**ब)** शिक्षकांनी मुलांचे अभिनंदन केले. (गुण १)



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**प्रश्न १६) खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.** (गुण ५)

मोबाईल, शाळा, आजोबा, मित्र.

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळित असू शकेल, गोष्ट नाही, त्रोटक लेखन. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका/ संवाद दिलेले आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

# संच : क

**प्रश्न १७) ‘किशोर’ या मासिकाच्या ‘बालविभाग’ या सदरामध्ये मुलांनी केलेले लेखन छापणार आहेत. त्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही.** (गुण ५)

१) पाणी  २) शेतकरी  ३) पुस्तक

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट** : स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या विषयांचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण |
| १ | दिलेल्या विषयांपैकी एका विषयाचा विचार करून सुट्या सुट्या वाक्यांचे लेखन. |
| २ | निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• मर्यादित कल्पना मांडलेल्या आहेत.<br>• लेखामध्ये मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला नाही. |
| ३ | निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाचकाला विषयाची नीटशी कल्पना येण्यासाठी पुरेसे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला आहे.<br>• कल्पनांचा/तपशिलाचा विस्तार केलेला नाही किंवा खूपच थोड्या प्रमाणात केला आहे. |
| ४ | • मांडलेल्या मुद्द्यातून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे, स्पष्टीकरणे आढळू शकतात. पण ही कमी/मर्यादित स्वरूपाची असू शकतात.<br>• लेखाची मांडणी सुसंगत आहे. पण एक-दोन ठिकाणी लेखन मुदद्यापासून भरकटते.<br>• वाक्यरचना नीट आणि वाक्यांचा पल्लाही वाढलेला आढळतो. |
| ५ | • मांडलेल्या मुद्द्यांतून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे देऊन, स्पष्टीकरणातून लेखनाचा विस्तार केलेला आहे.<br>• लेखाची मांडणी सुसंगत व ओघवती आहे.<br>• मुलाच्या लेखावरील भावना सुस्पष्ट आहेत. |



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

**संच : क**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**तिचा स्वभाव तसा चंचलच होता. म्हणून पेशवे तिला लाडाने 'छबिली' असं म्हणायचे.**

**कुठेही जायचं असलं तरी तिघं बरोबर असायचे. फिरायला जाताना, खेळताना, कुठेही त्यांचे त्रिकूट असायचे.**

**नानासाहेब आणि रावसाहेब यांच्याबरोबर मनूचेही शिक्षण सुरू झाले.**

**मनू मुळातच हुशार होती. त्यामुळे तिला काहीही शिकवले तरी ती पटकन शिकायची. मनू युद्धकलेचेही शिक्षण शिकली. लिहिणे-वाचणे, याबरोबर तलवार चालवणे, घोडदौड, धनुष्यबाण चालवणे, भालाफेक वगैरे सगळ्या गोष्टी मनू पटकन शिकली.**

**त्या काळात स्त्रियांना असले शिक्षण कधीच दिले जात नसे. त्यामुळे मनूचे सगळ्यांना कौतुक वाटत असे.**



***Runa Graphics :*** *Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*

## संच : क

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न २) मनूला पेशवे लाडाने कोणत्या नावाने हाक मारत असत?** | (१) | (अ) |

अ) छबिली

ब) छकुली

क) छुटकी

**तोंडी प्रश्न ३) मनू कोणकोणत्या गोष्टी शिकली?** (२)

(युद्धकला, लिहिणे-वाचणे, तलवार चालवणे,
घोडदौड, धनुष्यबाण चालवणे, भालाफेक)

**तोंडी प्रश्न ४) त्रिकूटामध्ये कोणाकोणाचा समावेश असायचा?** (२)

(नानासाहेब, रावसाहेब आणि मनू)

■■■



*Runa Graphics : Com. 3/D Question Paper/ Payabhut Chachani 2017-18/Marathi/Teachers For Instructions / Std. 6/Sanch-C/ Proof -II/19-06-2017/G*